## संक्षिप्त

### पंतप्रधान नरेंद्र मोदींची आज वर्धा जिल्ह्यात सभा

**वर्धा :** भाजप-महायुतीचे वर्धा लोकसभेचे उमेदवार खासदार रामदास तडस व अमरावती लोकसभा मतदारसंघाच्या उमेदवार खासदार नवनीत राणा यांच्या प्रचारार्थ देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची जाहीर सभा १९ एप्रिल रोजी दुपारी ३ वाजता तळेगाव (श्यामजी पंत) येथे आयोजित करण्यात आली आहे. उन्हाची तीव्रता लक्षात घेता सभास्थळी सुरक्षित आसरा व पाण्याची सुविधा उपलब्ध राहणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांची उपस्थिती राहणार आहे. मोदी वर्धा जिल्ह्यात तिसऱ्यांदा येत आहेत.

### पावस गाडीअड्डा येथे पान मसाल्याची विक्री करणाऱ्यावर गुन्हा

**रत्नागिरी :** तालुक्यातील पावस गाडीअड्डा येथे बुधवार १७ एप्रिल रोजी दुपारी १ वा. सुमारास विमल पान मसाला विक्री करणाऱ्याला पूर्णगड पोलिसांनी रंगेहाथ पकडले. त्याच्याकडून व्हॅन, रोख रक्कम, विमल पान मसाल्याचे पाऊच, तंबाखूचे व गुटखाचे पाऊच असा एकूण ३ लाख ४२ हजार ३४५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. रोशन संजय नाईक (२६, रा. कासारवेली भराडीनवाडी, रत्नागिरी) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या संशयिताचे नाव आहे. त्याच्या विरोधात महिला पोलिस हवालदार सोनाली शिंदे यांनी तक्रार दिली आहे. त्यानुसार, बुधवारी दुपारी संशयित रोशन हा आपल्या ताब्यातील ओमनी व्हॅन (एमएच-०८-झेड-३७५७) मधून पावस गाडीअड्डा येथे विमल पान मसाला, तंबाखू, गुटखा हे अपायकारक व नशाकारक पदार्थ विक्री करत असताना पूर्णगड पोलिसांनी त्याला रंगेहाथ पकडले. त्याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### केरळ येथील प्रौढाचा खेडमध्ये मृत्यू

**खेड :** केरळ येथील एका वृद्ध व्यक्तीची अचानक प्रकृती बिघडल्याने खेडमधील कळंबणी उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. तेथे दि. १६ रोजी रात्री ८.२५ वाजता त्यांचा मृत्यू झाला. तारादेल माधव श्रीनिवासन (वय-६४ वर्षे रा. कैपामंगल, बीच त्रिशुर राज्य-केरळ) हा व्यक्ती वेशुद्ध अवस्थेत असल्याचे उज्वला शिरिषकर यांनी १२ क्रमांकावर कळविले. त्यानंतर खेड येथील पोलीस साळवी यांनी त्याला उपजिल्हा रुग्णालय कळंबणी येथे उपचारासाठी दाखल केले. त्याच्या मोबाईलवरून त्याचा नातेवाईकांशी संपर्क करन त्यांना खेड येथे येण्यास कळवले होते. त्याच्यावर उपजिल्हा रुग्णालय कळंबणी येथे उपचार सुरू असताना रात्री ८.२५ वा. त्यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.

### मिरजोळेत पाण्यात बुडून तरुणाचा मृत्यू

**रत्नागिरी :** शहरानजीकच्या मिरजोळे येथे पाण्यात बुडून तरुणाचा मृत्यू झाला. ही घटना बुधवार १७ एप्रिल रोजी सायंकाळी ४.१५ वा. घडली आहे. मोरेश्वर अनंत पाटील (३६, रा. मिरजोळे पाटीलवाडी, रत्नागिरी) असे पाण्यात बुडून मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे. बुधवारी सायंकाळी मोरेश्वर पाटील हा नेहमीप्रमाणे आंघोळ करण्यासाठी मिरजोळे गावातील गणपती विसर्जन कॉड येथे गेला होता. त्याठिकाणी खोल पाण्यात गेल्याने त्याच्या नाका-तोंडात पाणी गेल्याने त्याचा बुडून मृत्यू झाला. याप्रकरणी शहर पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे

### घुडेवठार येथे तिघांकडून एकाला मारहाण

**रत्नागिरी :** शहरातील घुडेवठार येथे अज्ञात कारणातून एकाला तिघांनी जबर मारहाण केली. याप्रकरणी शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना मंगळवार १६ एप्रिल रोजी दुपारी ३.३० वा. घडली आहे. कुंदन घुडे, साईराज घुडे, अमोल नार्वेकर (सर्व रा. दत्तमंदिर शेजरी घुडेवठार, रत्नागिरी) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या तीन संशयितांची नावे आहेत. त्यांच्या विरोधात प्रितम रमाकांत वारंग (३६, रा. घुडेवठार, रत्नागिरी) यांने तक्रार दिली आहे. याप्रकरणी संशयितांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# निवडणूक गावाची नाही; तर देशाची!

## भारताच्या विकासासाठी मोदीच हवेत : पुण्यात महायुतीचा नेत्यांचे प्रतिपादन

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

लोकसभेची ही निवडणूक गावपातळीवरील किंवा विधानसभेची नसून देशपातळीवरील निवडणूक आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाचा, बारामतीचा विकास करण्यासाठी, देश मजबूत करण्यासाठी ही निवडणूक आहे, असा मुद्दा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांच्या भाषणात ठासून मांडला.

बारामती लोकसभा मतदारसंघातून महायुतीच्या वतीने राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार सुनेत्रा अजित पवार यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा पुण्यात आयोजिलेल्या सभेत ते बोलत होते. मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, ही विकासवाद विरुद्ध परिवारवाद अशी लढाई आहे. निवडणूक लोकसभेच्या एका मतदारसंघापुरती मर्यादित नाही. देश बलशाली, मजबूत

**पुणे : महायुतीच्या वतीने राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार सुनेत्रा अजित पवार यांनी पुण्यात गुरुवारी बारामती लोकसभा मतदारसंघासाठी उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यावेळी झालेल्या सभेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय मंत्री रामदास आठवले, प्रफुल्ल पटेल, डॉ. नीलम गोऱ्हे, चंद्रकांत पाटील, मेधा कुलकर्णी, हर्षवर्धन पाटील यांच्यासह महायुतीचे नेते उपस्थित होते.**

बनविण्यासाठीची आहे. यांना लेकीत व सुनेत अंतर वाटते. त्यांना मनात मांडे खाऊद्या. ज्यांच्या मनात मांडे, त्यांच्या पदरात धोंडे पडल्याशिवाय राहणार नाहीत. आता भाकरी फिरवायची वेळ आली आहे, असे ते म्हणाले.

फडणवीस म्हणाले, आजच्या सभेची गर्दी पाहून सुनबाई विरुद्ध सुप्रिया सुळे अशी लढाई नाही. देशाचा नेता कोण हे ठरविण्यासाठीची लोकसभेची निवडणूक आहे. बारामतीचा खासदार हा मोदींच्या बाजूने उभा राहणार की राहुल गांधींच्या ते ठरणार आहे, असे ते म्हणाले.

अजित पवार म्हणाले, ही निवडणूक नरेंद्र मोदी विरुद्ध राहुल गांधी अशी आहे. काहीजण भाजनिक मुद्दे मांडून भावकीचा मुद्दा आणत आहेत. आम्ही पुन्हा एकत्र येणार, अशी बनवाबनवी काहीजण करीत आहेत. त्याला फसू नका, अशी स्पष्टोक्ती त्यांनी केली. केंद्रीय मंत्री रामदास आठवले, खासदार प्रफुल्ल पटेल, उमेदवार सुनेत्रा पवार, माजिक परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, खासदार मेधा कुलकर्णी यांची भाषणे झाली.

**सुनबाई पाठवा दिल्लीत**

सुनबाई पाठवा दिल्लीत, लेकीला टेवा गल्लीत अशी घोषणा मला द्यावीशी वाटते, असे डॉ. नीलम गोऱ्हे यांनी भाषणाचा समारोप करताना सांगितले. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते शरद पवार यांनी यासंदर्भात केलेल्या उल्लेखावरून महायुतीच्या नेत्यांनी त्यांना टार्गेट केले आहे. त्याच पद्धतीने डॉ. गोऱ्हे यांनी ही घोषणा दिल्यानंतर उपस्थितांनी त्यांना दाद दिली.

### रामदास आठवलेंची कविता

अजितदादा आता राहिले
नाहीत खुळे
त्यामुळे हारणार आहेत
सुप्रिया सुळे
कोणी किर्तीही केला कल्ला
तरी सुनेत्रा पवार जिंकणार
बारामतीचा किल्ला
केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी ही कविता सादर करीत प्रचाराला प्रारंभ केला, तेव्हा उपस्थितींना त्यांना उत्स्फूर्त दाद दिली.

# हुबळीत कॉलेज युवतीची हत्या

## एकतर्फी प्रेमातून कृत्य

**हुबळी : पुढारी वृत्तसेवा**

येथील प्रतिष्ठित बीव्हीबी महाविद्यालयात नगर-सेवकाच्या मुलीची गुरुवारी (दि. १८) भर दिवसा चाकूने भोसकून हत्या करण्यात आली. संशयिताला काही वेळातच अटक करण्यात आली असून एकतर्फी प्रेमातून ही हत्या झाल्याचे उघडकीस आले आहे.

नगरसेवक निरंजन हिरेमठ यांची मुलगी नेहा एमबीएची विद्यार्थिनी होती. त्याच महाविद्यालयात शिकणाऱ्या फैय्याजने तिची चाकूने भोसकून हत्या केल्याचा आरोप आहे. तो बेळगाव जिल्ह्यातील सौंदत्तीतील रहिवासी आहे. गेल्या काही दिवसांपासून तो नेहाच्या मागे लागला होता. तिच्यावर तो एकतर्फी प्रेम करत होता. नेहाने त्याला नकार दिला होता. शिवाय पालकांनाही याबाबत सांगितले होते. पालकांनीही त्याला याबाबत इशारा दिला होता.

नेहाची एमबीएची परीक्षा सुरु होती. ती परीक्षा संपवून कक्षातून कॉलेज आवारात येत होती. त्याचवेळी फैय्याजने तिच्या गळ्यावर चाकूने वार केला. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या नेहाला तातडीने किम्समध्ये नेण्यात आले. पण, त्याचा काही उपयोग झाला नाही. तोपर्यंत तिचा मृत्यू झाला. घटनास्थळी चाकू टाकून पळ काढणाऱ्या संशयिताला पोलिसांनी पकडले.

**संशयित शिक्षक दांपत्याचा मुलगा**

संशयित फैय्याज हा बेळगाव जिल्ह्यातील मुनवळळीतील (ता. सौंदत्ती) आहे. त्याची आई मुतताज आणि वडील बाबासाहेब हे दोघेही सरकारी शाळेत शिक्षक आहेत. अनुत्तीर्ण झाल्यानंतर सहा महिने फैय्याज घरीच होता, अशी माहिती मिळाली आहे.

**अभाविपची निदर्शने**

घटना घडलेल्या काही मिनिटांतच अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या कार्यकर्त्यांनी शेकडोंच्या संख्येने एकत्र येवून बीव्हीबी महाविद्यालय आवारात निदर्शने केली. महाविद्यालयाबाहेरील रस्त्यावर टायर जाळून यावेळी विद्यार्थ्यांकडून संताप व्यक्त करण्यात आला. याबाबत माहिती मिळाल्यानंतर अतिरिक्त फौजफाटा घटनास्थळी तैनात करण्यात आला.

# मंड्या जिल्ह्यात बेटिंगमुळे पत्नी, दोन मुलांचा बळी

**बंगळूर : पुढारी वृत्तसेवा**

आगणीएलवर बेटिंग करून लाखो रुपये गमावलेल्याने पत्नी, दोन मुलांना जीवे मारून आपणही आत्महत्येचा प्रयत्न केला. मंड्या जिल्ह्यातील नागमंगल येथे गुरुवारी (दि. १८) ही घटना उघडकीस आली.

नरसिंह असे संशयिताचे नाव आहे. त्याने पत्नी कीर्तना (२३) व मुले जयसिंह (४), दीपिका (१) यांना विष पाजून मारले. त्यानंतर आपणही आत्महत्येचा प्रयत्न केला. सध्या तो भरवशा असून नागमंगल तालुका रुग्णालयात त्याच्यावर उपचार करण्यात येत आहेत. नरसिंहला आयपीएल क्रिकेट बेटिंगचा नाद लागला होता. तो रोज बेटिंग करत होता. यामध्ये त्याने अनेकदा पैसे गमावले. आज ना उद्या आगल्लाला गोडी लागेल. आज ना उद्या आगल्लाला पैसे परत मिळतील, अशी त्याला वाटत होती. यातून त्याने अनेकांकडून पैसे उसणे घेतले होते. यामध्ये त्याने लाखो रुपये गमावले.

### लाखो रुपये गमावल्याने पतीचे कृत्य : स्वत:चाही आत्महत्येचा प्रयत्न

त्यालाही पैसे दिलेल्यांकडून तगादा सुरू झाल्यानंतर नरसिंहला नैराश्य आले. त्याने आपल्या पत्नीसह दोन लहान मुलांना विष पाजले. त्यानंतर आपणही विष प्राशन केले. यामध्ये पत्नी आणि दोन्ही मुलांचा मृत्यू झाला. पण, नरसिंह वाचला. घटनेची नोंद नागमंगल पोलिसांत दाखल झाली आहे. सर्व मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत.

# परताव्याचे ४६ कोटी नौका मालकांच्या खात्यात

**रत्नागिरी : पुढारी वृत्तसेवा**

रत्नागिरी जिल्ह्यातील सुमारे १ हजार ३५० मासेमारी नौका मालकांना वर्षभरात ४६ कोटी रुपयांचे डिझेल परतावा अनुदान वितरीत करण्यात आले. उर्वरीत नौका मालकांना १४ कोटी रुपये कोषागार कार्यालयाकडून सहाय्यक मत्स्यव्यवसाय आयुक्त कार्यालयाकडून दिले जाणार आहेत. ह १४ कोटी रुपयांचा धनादेश बटून मत्स्यव्यवसाय विभागाकडे रक्कम प्राप्त झाल्यानंतर परताव वाटप केले जाणार आहे.

रत्नागिरी जिल्ह्याला १६७ कि.मी. चा समुद्र किनारा लाभला आहे. या समुद्रात जिल्ह्यातील २ हजार ५२० नौकांकडून मासेमारी केली जाते. त्याचबरोबर जिल्ह्यात ८५ मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था असून, या संस्थांचे सुमारे ४१ हजार नौका सदस्य आहेत. या सहकारी संस्थांपैकी २८ सहकारी संस्था डिझेल परताव अनुदानाच्या यादीत आहेत.

डिझेल परताव्याच्या यादीत असलेल्या २८ सहकारी संस्थांमधील सुमारे १४७३ सदस्य नौका परताव्यासाठी पात्र आहेत. गेल्या वर्षभरात म्हणजे सन २०२३-२४ मध्ये

सुमारे ६० कोटी रुपयांचे डिझेल परतावा अनुदान प्राप्त झाले. अनुदानाचे धनादेश कोषागार कार्यालयाकडे दिल्यानंतर ती रक्कम सहाय्यक मत्स्यव्यवसाय कार्यालयाला मिळते. येथून ती रक्कम निकषानुसार नौका मालकांच्या खात्यात जमा होते.

# उपनगर जिल्ह्यातील मतदान यंत्रांची सरमिसळ प्रक्रिया सुरु

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणूकीसाठी मुंबई उपनगर जिल्ह्यातील मतदान यंत्रांची पहिली सरमिसळ प्रक्रिया गुरूवारी उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात पार पडली. मुंबई उपनगर जिल्ह्यातील चारही मतदारसंघात २० मे रोजी मतदान होणार आहे. या पार्श्वभूमीवर मतदान यंत्रांची प्रथम सरमिसळ आणि मतदान यंत्रे मतदारसंघनिहाय ताब्यात घेण्याबाबतची प्रक्रिया गुरुवारपासून सुरू झाली.

यावेळी अपर जिल्हाधिकारी मनोज गोहाड, उपजिल्हा निवडणूक अधिकारी तेजस समेळ, उपजिल्हाधिकारी तथा इव्हीएम व्यवस्थापनाचे समन्वयक अधिकारी संदीप निचित यांच्यासह निवडणूक निर्णय अधिकारी, राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

भारत निवडणूक आयोगाच्या निकषानुसार मतदान यंत्रांची सरमिसळ प्रक्रिया संगणकीय पद्धतीने पूर्ण करण्यात आली. सरमिसळ याद्या तयार झाल्या असून विधानसभा मतदारसंघनिहाय भारतीय अन्न महामंडळाच्या राजेंद्रनगर, दत्तपाडा रोड, बोरिवली, पूर्व, मुंबई येथे मतदान यंत्रे संबंधित विधानसभेचे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या तात्काळ देण्याची प्रक्रिया सुरू होईल, अशी माहिती उपनगर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी श्रीरामराव यांनी दिली.

उपनगरांत लोकसभेचे चार, तर एका मतदारसंघाचा अंशतः समावेश आहे. तसेच विधानसभेच्या २६ मतदारसंघांचा समावेश असून सात हजार ३८० मतदान केंद्रे आहेत. त्यासाठी भारत निवडणूक आयोगाच्या निकषप्रमाणे बॅलेट युनिट ८८४५, कंट्रोल युनिट ८८४५, व्हीव्हीपॅटची १५८१ एवढी आवश्यकता असल्याचे श्रीरामराव यांनी सांगितले.

# मुंबई शहर जिल्ह्यातील मतदान यंत्रांची पहिली सरमिसळ प्रक्रिया पूर्ण

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

लोकसभा निवडणूकांसाठी मुंबई शहर जिल्ह्यातील मतदान यंत्रांची पहिली सरमिसळ प्रक्रिया जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी संजय यादव यांच्या उपस्थितीत गुरूवारी पूर्ण करण्यात आली. शहरातील दहा विधानसभा मतदारसंघनिहाय मतदान केंद्रांच्या प्रमाणात एकूण ३ हजार १६ बॅलेट युनिट, ३ हजार १६ कंट्रोल युनिट आणि ३ हजार २६८ व्हीव्हीपॅट मशीनची सरमिसळ प्रक्रिया पूर्ण करण्यात आली.

या प्रक्रियेसाठी अपर जिल्हाधिकारी रवि कटकभोंडे, उपजिल्हाधिकारी श्यामसुंदर सुरवसे, उपजिल्हाधिकारी तसेच इव्हीएम व्यवस्थापनाचे समन्वयक अधिकारी महादेव किरवले यांच्यासह सर्व राष्ट्रीय आणि राज्यातील मान्यता प्राप्त राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते. बैठकीच्या सुरुवातीला जिल्हाधिकारी संजय यादव यांनी मतदान यंत्र सरमिसळ प्रक्रांयेबाबत राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना माहिती दिली. लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणूकीसाठी मुंबई शहर जिल्ह्यातील दोन मतदारसंघात २० मे रोजी मतदान होणार आहे.

# गुंतवणुकीच्या नावाने १.६० कोटींची फसवणूक

## जोगेश्वरीतील घटना; हॉटेल व्यावसायिकाविरुद्ध गुन्हा दाखल

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

गुंतवणुकीच्या नावाने सोळाजणांची एक कोटी साठ लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी सलमान याकूब घडिया या हॉटेल व्यावसायिकाविरुद्ध ओशिवरा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. गुन्हा दाखल होण्यापूर्वीच सलमान हा पळून गेल्याने त्याचा पोलिसांकडून शोध सुरु आहे.

यातील तक्रारदार माहीम येथे राहत असून कुपर हॉस्पिटलमध्ये कामाला आहे. तीन वर्षांपूर्वी त्यांची सलमानशी ओळख झाली होती. या ओळखीत त्याने जोगेश्वरी एक हॉटेल चालविण्यासाठी घेतले आहे. या व्यवसायासाठी त्याने त्यांच्याकडे गुंतवणूक करावी. या गुंतवणुकीवर तो त्यांना चांगले व्याजदर देईल असे सांगितले होते. त्यामुळे त्यांनी त्याच्याकडे वीस लाखांची गुंतवणुक केली होती. काही महिने त्याने त्यांना व्याजदरावी रक्कम दिली, मात्र नंतर ही रक्कम देणे बंद केले होते.

याच दरम्यान त्याने त्यांना चार लाख रुपये परत केले होते. मात्र व्याजदराची रक्कम देणे बंद केल्यानतर त्यांनी त्याच्याकडे उर्वरीत पेशाची मागणी केली होती. मात्र त्याने त्यांना पैसे परत केले नाही. चौकशीदरम्यान त्यांना सलमानने त्यांच्यासह हत्र पंधराजणांकडून अशाच प्रकारे पैसे घेऊन त्यांची फसवणुक केल्याचे समजेले होते. या सर्वांकडून त्याने एक कोटी साठ लाख रुपये घेतले होते. मात्र कोणालाही पैसे परत न करता तो हॉटेल बंद करन पळून गेला होता. ह प्रकार लक्षात येताच या सर्वांनी ओशिवरा पोलिसांत सलमानविरुद्ध तक्रार केली होती. या तक्रारीनंतर पोलिसांनी त्याच्याविरुद्ध अपहारासह फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

सलमानने अशाच प्रकारे इतर काही लोकांकडून पैसे घेतल्याचे तपासात उघडकीस आले असून फसवणुकीचा हा आकडा आणखीन वाढण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. त्यामुळे त्याच्याकडून फसवणुक झालेल्या लोकांनी ओशिवरा पोलिसांशी संपर्क साधावा असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.


बँक ऑफ बड़ौदा
Bank of Baroda

**जाणा पाहिजे**

बँक ऑफ बडोदा खालील दिलेल्या प्रमाणे भिन्न शाखेचा स्थलांतरासाठी शक्यता तळमजल्यावर पाहोतलावर संपूर्णपणे तयार असलेल्या परिसरासाठी (**भोगवटा प्रमाणपत्रसहित**), परिसरामध्ये २४ तास प्रवेशासह तीन फेस पावर कनेक्शनसह विद्यमान शाखेकरीता मालक/ मुख्यत्यार धारकांकडून प्रस्ताव निमंत्रित करत आहे. इच्छुक प्रस्तावकर्त्यांनी त्यांचे प्रस्ताव मोहोरबंद लिफाफ्यामधून इमारतीच्या वर्णनासह जागेचा आराखडा, भाडे, (प्रॉपर्टी टॅक्ससहित), भाडेपट्टा कालावधी, भाडे अनामत रक्कम आणि इतर तपशील अशा अटी व शर्तीसह **बँक ऑफ बडोदा**, मुंबई मेट्रो दक्षिण क्षेत्र, उप मजला, ३, वालचंद हीराचंद मार्ग, कस्तूर प्लिस, मुंबई यांच्याकडे **दिनांक ०९.०५.२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत** पोहोचले पाहिजेत. सार्वजनिक क्षेत्रातील युनिट/ सहकारी विभागाच्या जागांत प्राधान्य देण्यात येईल.

| अ. क्र. | स्थलांतरण होणाऱ्या शाखेचे नाव (तळमजल्यावर माहोतलावर) | क्षेत्र | आवश्यक क्षेत्र चौरस फूट कार्पेटमध्ये |
|---|---|---|---|
| १. | मिनारा मस्जिद | मेट्रो | २०००-२५०० वर्गफिट |
| २. | खेतवाडी | मेट्रो | २०००-२५०० वर्गफिट |

अधिक माहितीसाठी आमच्या **www.bankofbaroda.com** या संकेतस्थळावर टॅब या विभागावर भेट द्यावी. बॉक्स कोणतेही वरला न देता प्रस्ताव स्वीकरण्याचा किंवा नाकरण्याचा अधिकार आहे.

स्थळ : मुंबई
दिनांक : १९.०४.२०२४

उप महाव्यवस्थापक
(मुंबई मेट्रो दक्षिण क्षेत्र)
बँक ऑफ बडोदा


# भाकरी फिरवायची आहे : आ.राणे

**चिपळूण शहर : पुढारी वृत्तसेवा**

गेली दहा वर्षे खासदार असताना काही करू शकला नाहीत. आता ही भाकरी फिरवायची आहे. त्यासाठी महायुती हाच पर्याय आहे, असे प्रतिपादन भाजपचे आ. नितेश राणे यांनी चिपळूणात केले.

आ. राणे म्हणाले की, कोकणच्या विकास प्रकल्पांना विरोध करून तरूण-तरूणींच्या रोजगारामध्ये अडथळे आणण्याचे काम उबाठा सेनेचे नेते उद्धव ठाकरे आणि विद्यमान खासदार विनायक राऊत यांनी केले. कोकणचे नेते व माजी मुख्यमंत्री नारायण राणे यांना महायुतीची उमेदवारी जाहीर झाल्याने या पुढच्या काळात त्यांच्या माध्यमातून येथील बेरोजगारी कशी दूर होईल आणि उद्योगधंदे कोकणात कसे येतील यासाठी प्रयत्न होईल. बेट मोर्चीबरोबर त्यांचा संपर्क असल्याने विकासात काही कमी पडणार नाही, अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या.

चिपळूणच्या विकासाचे जे प्रश्न आहेत, पूरप्रश्न आहे याबाबत निकालानंतर तातडीने हे प्रश्न सोडविले जातील. मतदारसंघाचा विकास करायचा असेल तर बेट पंतप्रधान, गृहमंत्री, राजकीय पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष यांच्याशी बेट चर्चा घडवून काम करून घेण्याची धमक राणे यांच्यात असल्याचेही ते म्हणाले.

यावेळी भाजपचे माजी नगरसेवक विजय चितळे, शहर अध्यक्ष राम रिंदे, महिला मोर्चा प्रदेश नेत्या चित्रा चव्हाण, तालुकाध्यक्ष वसंत ताम्हणकर, आशिष खातू, शुभम पिसे, अनिल सावर्डेकर होते.

### राणे-सामंत कुटुंब महायुतीत एकत्रच...

केंद्रीय मंत्री नारायण राणे यांना पक्षाकडून अधिकृत उमेदवारी जाहीर झाली आहे. त्यामुळे महायुतीमधील सर्व घटक पक्ष व नेते त्यांच्या प्रचारासाठी एकत्रित काम करणार आहेत. सामंत यांची नाराजी दूर झाली आहे. या संदर्भात उद्योगमंत्री उदय सामंत व त्यांचे बंधू किरण सामंत यांच्याशी मी प्रत्यक्ष बोललो आहे. आता यापुढे राणे व सामंत कुटुंबीय महायुतीचा एकत्र प्रचार करून राणे यांना विजयी करणार आहोत.

# 'एलईडी'ने मासेमारी करणाऱ्या चार नौका पकडल्या

**रत्नागिरी : पुढारी वृत्तसेवा**

रत्नागिरीच्या समुद्रात एलईडी दिव्याच्या प्रकाशात मासेमारी करणाऱ्या ४ नौका तटरक्षक दलाने पकडल्या. गुरुवारी सायंकाळी उशीरा या नौका सहाय्यक मत्स्यव्यवसाय आयुक्त कार्यालय अधिकाऱ्यांच्या ताब्यात दिल्या आहेत. मच्छीमार संघटनांनी एलईडी मासेमारी करू नये, असे आवाहन करूनही त्याकडे काही नौका मालक जाणूनबुजून दुर्लक्ष करत आहेत.

तटरक्षक दलाचे जहाज समुद्रात गस्त घालत असताना रत्नागिरीच्या समुद्रात एलईडी प्रकाशात मासेमारी करणाऱ्या चार नौका दिसून आल्या. त्या ताब्यात घेऊन सहाय्यक मत्स्यव्यवसाय विभागाला कळविण्यात आले. या चारही नौका सहाय्यक मत्स्यव्यवसाय विभागाच्या ताब्यात देण्यासाठी अधिकाऱ्यांना दुपारी कळविण्यात आले. अधिकारी भगवती बंदर येथे सायंकाळी उशीरापर्यंत तटरक्षक दलासह त्या चार नौकांची वाट पाहत होते.

एलईडी प्रकाशात मासेमारी करणाऱ्या चार नौकांमध्ये दोन नौका एलईडीचे साहित्य घेऊन होत्या. याचवेळी इतर दोन नौका त्या एलईडी प्रकाशात मासेमारी करत होत्या. या चारही नौका सहाय्यक मत्स्यव्यवसाय विभागाच्या ताब्यात आल्यानंतर त्या नौका मालकांवर कारवाई करण्यात येईल.

सुधारित सागरी मासेमारी कायद्यानुसार प्रत्येक नौकेला ५ हजार रुपयांचा दंड होण्याची तरतूद असल्याचे मत्स्यव्यवसाय विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

# महाविकास आघाडीचे आज रत्नागिरी तालुक्यात मेळावे

**रत्नागिरी :** रत्नागिरी-सिंधुदुर्ग लोकसभा मतदार संघातील महाविकास आघाडीचे उमेदवार खा. विनायक राऊत हे शुक्रवारी १९ एप्रिल रोजी रत्नागिरी तालुक्याच्या बौऱ्यानर आणुन, तीन ठिकाणी मेळावे घेणार आहेत.

तालुक्यातील वाटद व कोतवडे जिल्हा परिषद गटाचा मेळावा गणपतीपुळे येथील महालक्ष्मी हॉल येथे सकाळी १० वा. होणार आहे. रत्नागिरी शहराचा मेळावा माळनाका मराठा हॉल येथे दुपारी २ वा. होणार आहे. सायं. ७ वा. गोळप व पावस जि. प. गट मेळावा महाकाली पॅलेस पावस येथे होणार आहे. महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन पदाधिकाऱ्यांनी केले आहे. आता एकूणच निवडणूकीचा ज्वर वाढू लागला असल्याचे दिसून येत आहे.


**पश्चिम रेल्वे**

**निविदा कामे**

मिरारोड रेल्वे व्यवस्थापक (टाकसू), पश्चिम रेल्वे, दमा मजला, अभियांत्रिकी विभाग, मुंबई सेंट्रल, मुंबई-४०० ००८, दे भ्रमु. क्र. : १.ई-निविदा सूचना क्र. : बीसीटी/३४-३५/२५/०१ दिनांक १५/०४/२०२४ मागवत आहेत. काम आणि ठिकाण : बिरार-जोरावरमन विभाग-एसीईएल-टीआरडी विभागअंतर्गत पुलावरातील रस्ते क्र. ४४,४५,४६,५०,५३,५४,५९,६३ आणि ६५ (एकूण ०९ क्र.) येथे मिक्सिंग डिझायनी आणि एसीईएल-सीएल विभागअंतर्गत पुलावरातील रस्ते क्र. ७१,७८,८१, वगळे सबळे आणि भिवंडत पुलावरातील रस्ता (एकूण ०५ क्र.) पावसाचे पाणी उपसून काढण्यासाठी गाळ डिसेंटर पंप पुरवणे. कामाचे अंदाजे मूल्य : ₹ १७,७५,१३६/- कामाचा रक्कम : ₹ ३५०.०० आणु. क्र. : ३. ई-निविदा सूचना क्र. : बीसीटी/३४-३५/१० दिनांक १५/०४/२०२४ काम आणि ठिकाण : बिरार-जोरावरमन विभाग- १) बिरार सूत-टीआरआर(पी)-२०.०३८टी किमी आणि टीएसआर(पी) १९.०९८टी किमी २) बिरार-सूत-सीटीआर(एच/पी)-४.३९३टी किमी आणि टीआरआर(एच)-६.६९५टी किमी सी सिविल वरिष्ठ डीईएन/उत्तर न्यायपरिक्षेत्रा आरटीएसओ मान्यताप्राप्त संस्थेचे रोलोटेक वेल्डीग मशिनचा वापर करन वर्ग प्रकारच्या नवुनवल सीएमएम (कमाल वीजेचेक स्टील) क्रॉसिंगची जोगेश्वर दुरुस्ती कामाचे अंदाजे मूल्य : ₹ १६,२२,६०२.०८/- कामाचा रक्कम : ₹ १२,९००.०० वरील दोन्ही निविदा प्रस्तुत करण्याचा दिनांक आणि वेळ : १९.०५.२०२४ रोजी १५.०० पर्यंत खुले होण्याचा दिनांक आणि वेळ : १९.०५.२०२४ रोजी १५.३० वाजता. निविदा वेबसाईट http://www.ireps.gov.in वर पाहता येईल. 0047

प्रसाद लाड सर
facebook.com/WesternRly



NHSRCL
National High Speed Rail Corporation Ltd
(केंद्र सरकार आणि महाराष्ट्र राज्य सरकारे यांची संयुक्त क्षेत्र कंपनी)

**नॅशनल हाई स्पीड रेल कॉर्पोरेशन लिमिटेड**

**निविदा आमंत्रण सूचना**

एनएचएसआरसीएल "मुंबई-अहमदाबाद अतिजलद रेल्वे प्रकल्पासंदर्भात दिवे अंजूर गाव, तालुका भिवंडी, जि ठाणे मधील सर्वांकडे. ५७, ७८, ३३ आणि ३४ वरील गोदाम (पीडीसी संरचना) अंशतः तोडणे आणि मजबूतीकरण करणे" यासाठी खुल्या निविदा मागवत आहेत. (निविदा सूचना क्र. एनएचएसआरसीएल/एसए/सीपीएस/एसएसए/डब्ल्यूआरके/२४-२५/०१). निविदा १९.०४.२०२४ रोजी १२.०० पासून १९.०५.२०२४ रोजी १५.०० वाजेपर्यंत http://etenders.gov.in/eprocure/app वरून डाऊनलोड करून घेता येईल.

बोली सादर करण्याचा अंतिम दिनांक १९.०५.२०२४ रोजी १५.०० वाजेपर्यंत आहे.

मुख्य प्रकल्प व्यवस्थापक / मुंबई



**Required**
(For Kalbadevi-Mumbai)

**Accountant**

He has to look after Advt. Accounts, Billing, Sales Collection & Recovery. Banking etc. Should be Graduate / Post Graduate having 2-3 years relevant experience. Also he will be able to handle for all aspects of Administration. Knowledge Computerised Accounting/ERP System is must. A person in newspaper industry will be preferred.

Send your resume immediately to
pankaj.sharma99662@gmail.com